॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

‘A’ Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. १२ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान प्रशाळेत प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येत असलेल्या इंडक्शन प्रोग्रॅम-2025 अंतर्गत आज प्रयोगातून विज्ञान या उपक्रमात भौतिकशास्त्रातील संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिकण्याचा वेगळाच आनंद घेतला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा.दिलीप भारंबे हे होते. विज्ञान समजून घ्यायचे असेल तर प्रयोग हा सर्वात सोपा मार्ग आहे.

प्रशाळेचे संचालक प्रा. ए.के. गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली प्रयोगातून विज्ञान हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रा.दिलीप भारंबे यांच्यातर्फे विज्ञान संदर्भातील विविध प्रयोग दाखविण्यात आले. प्रयोगाच्या वेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.विकास पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.विश्वराज तायडे यांनी केले. यावेळी प्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

बातमी

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १२ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. १२ - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, क्षेत्र संचालन विभाग, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील गणितशास्त्र प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सांख्यिकीच्या ७५वर्षाचा प्रवास- भारत सशक्तीकरणाकडे वाटचाल' ही कार्यशाळा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दि. ३ सप्टेंबर रोजी संपन्न झाली.

यावेळी जयप्रकाश होनराव, छत्रपती संभाजीनगर, शरद शिंदे संचालक, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, नांदेड, कार्यशाळेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष वरीष्ठ सांख्यिकी अधिकारी प्रवेंद्र कुशवाह, अश्वीन जैन, मोहम्मद लतीप अन्सारी व प्रमोद पाटील सहायक संचालक, जळगाव, प्रशाळेचे संचालक प्रा.किशोर पवार,विभाग प्रमुख प्रा. आर.एल. शिंदे, प्रा.किर्ती कमळजा,प्रा. हरीभाऊ तिडके हे उपस्थित होते. या प्रसंगी श्री. होनराव यांनी राष्ट्रीय नमुना सर्व्हेक्षणाचे महत्व, प्रक्रिया, आवाका आणि शासकीय धोरणामध्ये अधिकृत आकडेवारीची भूमिका आपल्या मनोगतातून सांगितली. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संशोधन व माहिती संकलन क्षेत्रातील नवनवीन संधींची माहिती देवून प्रात्यक्षिके सादर केली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा, सांख्यिकी सर्वेक्षण जनजागृती कार्यक्रम, डेटा युजर कार्यशाळा या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सांख्यिकी, ॲक्च्युरल सायन्स व गणित विभागातील पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थी तसेच प्राध्यापकवर्ग असे एकूण १७५ सहभागी झाले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १२ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता